नियमीत फौ. ख. क्र. ४७/२०२३
सरकार -वि.- प्रशांत
नि.क्र. ४.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - प्रकाश फकिरा धाडसे,
वय ४२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – भिवापुर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी. बी. राऊत यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखतो. ते आज कोर्टात हजर आहेत. दिनांक २५.०५.२०२३ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला नव्हता. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नव्हती. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा वरील सहीला **निक्र.५** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.०५.२०२३ रोजी पोलिसांनी मला पोलिस स्टेशन टि पॉईंट भिवापुर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष एक रेतीचा टिप्पर क्रमांक एम.एच.४० बी.एल. ३३७४ व त्यामध्ये ६ ब्रास रेती

आरोपींच्या ताब्यातुन जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तसा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला व मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा मित्र आहे त्यामुळे मी त्यांना वाचनविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री पी. एस. हुंगे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २०.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.